## प्रपत्र - एक

## आदेश व निर्देश

## प्रकरण - पाचवे

## समारोप आणि निष्कर्ष

ललित वाङ:मयाचा कथा, कादंबरी, नाटक, काव्य, आत्मचरित्र असे जे वेगवेगळे वाङ:मय प्रकार आहेत त्यात ललित लेखन हा सर्वात आधुनिक आणि लोकप्रिय वाङ:मयप्रकार आहे. मराठी साहित्यात १९२५च्या दरम्यान प्रा. ना.सी. फडके आणि वि.स. खांडेकर यांनी हा वाङ:मयप्रकार आणून तो समृध्द आणि लोकप्रिय केला. हितगुज, गुजगोष्टी, लघुनिबंध, ललित निबंध अशा स्वरूपात तो परिवर्तित होत गेला. आणि त्याला १९६० नंतर "ललित गद्य" किंवा "ललित लेखन" असे स्वरूप प्राप्त झाले. १९६० नंतर मराठीतील अनेक साहित्यकराने आपआपल्या परिने आणि स्वतंत्ररित्या ललित लेखन केले. मुळातच हा वाङ:मयप्रकार मुक्त वाङ:मयप्रकार असल्याने त्याचे स्वरूप सतत बदलत गेले. त्यामुळे आज तर तंत्रविरहीत वाङ:मयप्रकार असे त्याचे स्वरूप बनले आहे.

१९६० नंतर ज्या मराठी लेखकानी हा वाङ:मयप्रकार समृध्द केला त्यापैकी एक प्रमुख आणि प्रसिध्द लेखक म्हणजे डॉ. निर्मलकुमार फडकुले हे होत. डॉ. फडकुले महाराष्ट्रात प्रसिध्द आहेत ते एक उत्कृष्ट वक्ते आणि संत साहित्याचे अभ्यासक म्हणून परंतू ते एक उत्कृष्ट प्रकारचे ललित लेखक आहेत याकडे फारसे कोणी लक्ष दिले नाही. त्यांच्यातील "वक्ता" एवढाच त्यांच्यातील "लेखक" हा ही प्रभावी आहे म्हणून लघु-प्रबंधाच्या अभ्यासाठी त्यांच्या पाच ललित लेख संग्रहापैकी प्रारंभच्या काळात लिहिलेले "हिरव्या वाटा" (१९८६) आणि "आनंदाची डहाळी" (१९८८) हे दोन लेखसंग्रह अभ्यासाठी निवडले आणि

त्यांच्या ललित लेखनाची कोणती वैशिष्टये आहेत याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न या लघु-प्रबंधात केला आहे. हा मागोवा घेताना मराठीतील एकंदरीत ललित लेखन आणि त्या अनुषंगाने डॉ. फडकुले यांच्या ललित लेखनाची वैशिष्टये या संबंधी कांही निष्कर्ष हाती लागतात ते पुढील प्रमाणे :-

निष्कर्ष :-

१) कथा, कांदबरी, काव्य, नाटक या वाङ्‌मयप्रकारापेक्षा "ललित लेखन" हा वाङ:मयप्रकार कमालीचा आत्मनिष्ठ आहे. त्यामुळे त्यात लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा इतर कोणत्याही वाङ:मयप्रकारापेक्षा अधिक अविष्कार झालेला असतो.

२) ललित लेखन हा एक मुक्त वाङ:मयप्रकार असल्याने त्याचे नेमके तात्विक स्वरूप सांगणे, तंत्र ठरविणे, तंत्राच्या चौकटीत बसविणे अवघड आहे. प्रत्येक लेखकाने वेगवेगळ्या पध्दतीने ललित लेखन लिहिल्याने ललित लेखनाचे नेमके स्वरूप ठरविणे अवघड आहे. तथापी त्याची विविध वैशिष्टये मात्र सांगता येतील.

३) ललित लेखनासाठी गंभीर आणि हलकाफुलका असा कोणताही विषय चालतो. आणि त्या विषयाच्या अनुषंगाने ललित लेखक मुक्तपणाने लेखन करीत असल्याने लेखकाच्या लेखनात विचारतरंग, भावतरंग, कल्पनातरंग, उमटलेले असतात. त्याचा संबंध लेखकाच्या व्यक्तिमत्वाशी असतो. "मी" ला केंद्रस्थानी ठेवून ललित लेखक एखाद्या विशिष्ट विषयाच्या आधारे सहजतेने, मोकळेपणाने लेखनाची मांडणी करतो.

४) ललित लेखन हा आजचा वाङ:मयप्रकार पूर्वीच्या लघुनिबंधातून विकसित झाला आहे. म्हणून निबंध आणि ललित निबंध यातील साम्य-भेदाचा विचार करावा लागतो. निबंध आणि ललित निबंध या दोहोंमध्ये लेखकाची भूमिका, लेखाचे विषय, लेखांची मांडणी, लेखांची भाषाशैली याबाबतीत मूलभूत फरक असल्याने निबंध आणि लघुनिबंध या दोहोंची प्रकृती, प्रवृत्ती आणि प्रेरणा भिन्न असल्याने ललित निबंधाचा निबंध या वाङ:मयप्रकाराशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. म्हणून ललित निबंध आणि त्यातून विकसित झालेला ललित लेखन हा एक स्वतंत्र वाङ:मयप्रकार आहे.

५) मराठीत १८४० ते १९२० या कालखंडात निबंध वाङ:मयाला सुरुवात झाली. या कालखंडातील कांही लेखकांच्या निबंधातून ललित निबंधाची वैशिष्ट्ये दिसून येत असली तरी त्यांना ललित निबंध म्हणणे योग्य होणार नाही. म्हणून १९२५ पासून ख-या अर्थाने मराठीत ललित निबंधाला सुरुवात झाली आणि त्याचे श्रेय प्रा. ना.सी. फडके आणि वि.स. खांडेकर या लेखकांना द्यावे लागेल. १९२० ते १९६० या कालखंडात प्रा. फडके आणि वि.स. खांडेकर यांच्या ललित निबंधाच्या प्रभावाने ललित निबंधाची निर्मिती झाली. त्यामुळे विशेषतः प्रा.फडके यांनी लघुनिबंधाच्या तंत्राचा विचार मांडले आहे. या कालखंडातील ललित निबंध फडके प्रणित वाटतात. त्यामुळे कांही अशी कृत्रिमता निर्माण झालेली जाणवते. पण १९६० नंतर मराठीतील ललित निबंध विविध अंगानी विकसित झाल म्हणून "ललित लेखन" असे एक नव्हे स्वरुप प्राप्त झाले.

६) हितगुज, गुजगोष्टी, लघुनिबंध, ललित निबंध या मार्गाने आजच्या मराठीतील ललित लेखनाचा विकास झाला आहे.

७) ललित निबंधाचा विचार करताना आत्माविष्कार हे तत्व महत्वाचे असल्याने लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा विचार करावा लागतो. परंतु हे व्यक्तिमत्व लेखकावर झालेला संस्कारातून, त्यांच्या जीवनानुभवातून आकार घेत असते म्हणून लेखकाच्या जीवनचरित्राचा शोध घेत त्याच्या व्यक्तिमत्वाची घडण-घडण कशी झाली हे पाहणे उचित ठरते. त्यासाठी डॉ. फडकुले यांच्या जीवनचरित्राचा आलेख काढला आहे. पुण्यासारख्या संस्कृती नगरीत झालेले महाविद्यालयीन शिक्षण, अध्यापन क्षेत्रातील प्रदिर्घ सेवा, चौफेर वाचनाचा व्यासंग, वक्तृत्वाची साधना, साहित्यिकांचा आणि कलावंताचा सहवास, समाजमनस्क प्रवृत्ती, बुध्दीवादी दृष्टीकोन, आणि ललित लेखनाचे आकर्षण यातून त्यांचे एक विशिष्ट प्रकारचे व्यक्तिमत्व बनले आहे.

८) त्यांच्यावर जे संस्कार झाले आणि जे जीवनानुभव आले याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्वावर झाला आहे. तसाच साहित्यावरही झाला आहे. म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडण-घडणीतील घटक त्यांच्या ललित लेखनातून व्यक्त होणा-या व्यक्तित्वातही आढळून येतात.

९) डॉ. फडकुले यांच्या ललित लेखनात जीवनविषयक, समाजविषयक, साहित्य-विषय, भावनात्मक, आत्मपर असे विविध प्रकारचे विषय आढळत असले तरी त्यांची प्रवृत्ती ही चिंतनपर असल्याने जीवन, समाज यातील गंभीर

विषयांकडे त्यांचा अधिक कल आहे. हलके-फुलके, चटपटीत अशा विषयावर ते फारसे लिहित नाहीत.

१०) त्यांच्या लेखनाचे विषय गंभीर असले तरी ते लेखाचा प्रारंभ आणि लेखाची मांडणी मात्र आकर्षक वुसंबुंधितपणे करतात. मांडणी करताना इतिहास, पुराण, विविध भाषेतील वाङ्मयातील उदाहरणे, दृष्टांत सुभाषिते देऊन चिंतनशील विचारांना लालित्याची बैठक प्राप्त करून देतात. म्हणून त्यांचे ललित लेख हे निबंध आहेत असा आक्षेप घेता येणार नाही. स्वैर चिंतन हे त्यांच्या आशयाचे एक वैशिष्ट्य आहे.

११) ललित लेखांचा विस्तार करतातना ते आपल्या वैयक्तिक जीवनातील अनुभवाचे चित्रण करण्यापेक्षा बाहय जीवनातील अनुभवांचे अधिक चित्रण करतात. त्यांनी जर वैयक्तिक अनुभवांची मुक्त अभिव्यक्ती केली असती तर त्यांच्या ललित लेखनांची उंची अधिक वाढली असती.

१२) त्यांच्या व्यक्तिमत्वातील जडण-घडणीचे घटक हे त्यांच्या ललित लेखांतील व्यक्तिमत्वामध्येही आढळून येतात.( चिंतनशीलता, बुध्दिवादी दृष्टीकोन, सामाजिक प्रश्नांविषयी आत्मियता, जीवन प्रेम, आशावादी व आनंदवादी दृष्टीकोन अशी लेखनातून आढळून येतात.)

१३) डॉ. फडकुले यांचे ललित लेखन गंभीर विषयावरचे असले तरी त्यात लालित्य निर्माण झाले आहे. त्याचे कारण म्हणजे त्यातील अभिव्यक्ती सौंदर्य. ललित लेखांचा प्रारंभ ते आकर्षकपणे करतात. त्यांची ललित लेखनातील भाषाशैली वक्तृत्वपूर्ण आणि वाद-संवादी आहे. मराठी, संस्कृत व इंग्लीश साहित्यातील विविध संदर्भांचा आणि सुभाषितांचा त्यांनी

वापर केल्याने त्यांच्या भाषेत आकर्षकता आणि ताजेपणा निर्माण झाला आहे. सहज - सुंदर संस्कृतप्रचूर भाषाशैलीत शाब्दिक कोटया करीत त्यांनी अभिव्यक्ती केली आहे.

१४) विशेषत: अनेक लेखांतून काव्यमयता आणि कल्पना विलासात्मकता यांचा आविष्कार झाल्याने त्यांचे ललित लेख वाचकांच्या मनावर प्रभाव पाडतात.

१५) साठोत्तरी कालखंडात मराठी ललित निबंधामध्ये त्यांच्या वैशिष्टयपूर्ण ललित लेखनाने भर घातली आहे.

वरील निष्कर्षांचे सविस्तर व साधार विवेचन या लघु-प्रबंधातील चार प्रकरणातून केले आहे. त्यातून त्यांच्या ललित लेखनाचे अंतरंग व बहि:रंग यातील सौंदर्यस्थळे व सामर्थ्यस्थळे स्पष्ट होतात. तसेच त्या लेखनाला कांहीशा पडलेल्या मर्यादाही स्पष्ट होतात. तथापी डॉ. फडकुले हे "सिध्दहस्त" ललित लेखक आहेत हे या लेखसंग्रहांच्या आधारे मान्य करावे लागते.

* * * * * * *
* * * * * *
* * * * *
* * * *
* * *
* *
*

## परिशिष्ट - १

### डॉ. निर्मलकुमार फडकुले यांची मुलाखत

## परिशिष्ट--२

### निर्मलकुमार फडकुले यांची

### जीवन-रेखा आणि साहित्य संपदा

## परिशिष्ट - ३

### संदर्भ - सूची